लोकमत सिंधुदुर्ग, गुरूवार, १६ ऑक्टोबर २०१४

# हळबे महाविद्यालयात रक्तदान शिबिर उत्साहात

कसई दोडामार्ग : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक सूर्यकांत परमेकर, डॉ. रामदास रेडकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. यु. दरेकर उपस्थित होते.

शिबिरात विद्यार्थिनींचे हिमोग्लोबीनचे प्रमाण गरजेपेक्षा कमी असल्याचे आढळून आले असून, यासंदर्भात मायलेकींचा मेळावा घेऊन तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन शिबिर लवकर आयोजित करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. पाटील यांनी सांगितले.

डॉ. रेडकर यांनी रक्तदानाबद्दल असलेले गैरसमज दूर करून रक्तदानासाठी युवक, युवतींनी पुढे येण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

प्रा. रामकिसन मोरे यांनी रक्तदान शिबिरामागील हेतू स्पष्ट केला. सूत्रसंचालन मयुरी गवस यांनी केले. अनिल गावडे यांनी रक्तदान शिबिराला उपस्थित असलेल्यांचे आभार मानले. (वार्ताहर)